तरुण भारत
Nagpur Pages | 2022-06-05 | Page-2
epaper.tarunbharat.net

# गरज अक्षय ऊर्जास्रोतांच्या विकासाची

## डॉ. प्रमोद चौधरी यांचे मत

◆ **नागपूर, ४ जून**

'फक्त एक धरा' या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनाकडे जगाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न केले जात आहेत. ते टिकाऊ ठरावेत यासाठी गरज आहे ती अक्षय ऊर्जास्रोतांचा विकास आणि अवलंब वाढविण्याची. जैवइंधने हे त्यावरील शाश्वत उत्तर ठरू शकते, असे मत प्राज इंडस्ट्रीज लिमिटेडचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी यांनी व्यक्त केले.

जागतिक पर्यावरण दिनाच्या पूर्वसंध्येला ते म्हणाले की, तापमानवाढीचा धोका जगाच्या उंबरठ्यावर असताना शाश्वत विकास आपल्यासाठी अपरिहार्यता ठरली आहे. वाढते औद्योगिकीकरण आणि सर्वव्यापी विकास यासाठी ऊर्जेची गरजही वाढत आहे. पृथ्वीच्या पोटातून खनिज इंधन स्रोतांचा साठा काढून या मागणीची पूर्तता केली जात असली तरी त्यातून भरून येणार नाही असे पर्यावरणाचे नुकसान होत आहे. शहरीकरण आणि पायाभूत सोयींचा विकास साधताना मोठ्या प्रमाणावर वननिर्मूलनही होत आहेच. औद्योगिकीकरण आणि दळणवळणामुळे हरितगृह वायूंचा उत्सर्गही वाढत असून तापमान वाढीला हा आणखी एक घटक कारणीभूत ठरत आहे.



मागील सात वर्षे इतिहासातील सर्वाधिक उष्मांकाची ठरलीत. त्यामुळे जागतिक तापमानवाढ औद्योगिकीकरणपूर्व स्तरापेक्षा १.५ अंश से.हून अधिक होणार नाही, यासाठी तातडीने पावले उचलण्याचे आवाहन हवामान बदलविषयक ग्लास्गो परिषदेत २०२१मध्ये करण्यात आले आहे.

प्राज इंडस्ट्रीज ही आमची कंपनी जैव अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी कार्यरत असून शाश्वत विकासासाठीचे तंत्रज्ञान आम्ही विकसित आणि कार्यान्वित करीत आहोत. रस्ते, जलमार्ग आणि हवाई मार्ग यासाठी किमान कर्बोत्सर्ग होईल अशा अक्षय इंधनांच्या निर्मितीचे तंत्रज्ञान आम्ही विकसित केले असून, त्याला आम्ही बायोमोबिलिटी म्हणतो. याखेरीज, अक्षय रसायने व साधनांची निर्मिती करण्यायोग्य तंत्रज्ञानही आम्ही विकसित करीत आहोत. त्याला आम्ही बायोप्रिझम असे नामाभिधान केले आहे. इ. स. २०४७पर्यंत भारत ऊर्जेच्या क्षेत्रात स्वावलंबी व्हावा, हे सरकारचे उद्दिष्ट आणि तापमानवाढीचा मुकाबला करण्यासाठीची पंतप्रधानांनी जाहीर केलेली पंचामृत योजना यांना अनुसरून आम्ही हा तंत्रविकास करीत आहोत. उद्याचे जग अधिक सुखकर करण्याची ताकद तंत्रज्ञानामध्ये आहे, ही माझी पक्की धारणा आहे. पर्यावरण संवर्धनासाठी आणि जैव अर्थव्यवस्था विकसित होण्यासाठी शाश्वत विकास साधणारी पावले उचलण्यासाठी प्राज वचनबद्ध आहे, असे डॉ. प्रमोद चौधरी म्हणाले. वा

Powered by iDocuments